## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०४/२०१७

**१) संगनमत करुन जुण्या भांडणावरुन गळा दाबुन जखमी करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०९/०४/२०१७ चे ०२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घरासमोरील रोडवर उभा असता तेव्हा आरोपी क्र. १ व २ याने जुण्या भांडणावरुन फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीचे पत्नीने आरोपींना हटकले असता तेव्हा आरोपी क्र. २ चे पत्नीने फिर्यादीची पत्नी सौ. गिता पंढरी शेन्डे वय ४० वर्ष, हिचे केस धरुन गळा दांबुन जखमी केले व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी पंढरी विठोबा शेन्डे वय ५५ वर्ष, रा. नानोरी दिघोरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) धानावर फवारणी करीत असतांना विषबाधा झाल्याने तरुणांचा मृत्यु. :—**

दिनांक १०/०४/२०१७ चे १८.०० वा. दर यातील फिर्यादीचा पुतण्या जितेश व्यकंट पटले वय १९ वर्ष, रा. परसोडी याने शेतात धानावर फवारणी केली असता त्यास विषबाधा झाल्याने औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्नालय येथे आनले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी भरत जागोबाजी पटले वय ६५ वर्ष, रा. परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**३) रेल्वे अपघाताने जखमी झाल्याने औषधोपचार दरम्यान महीलेचा मृत्यु . :—**

दिनांक ०८/०४/२०१७ चे १४.०० वा. दर यातील मृतक सौ. सोनाली जौशेल शिंदे वय २८ वर्ष ,रा. हनुमान वार्ड वरठी ही रेल्वे अपघाताने जखमी झाल्याने तिला रेल्वे कर्मचाऱ्यांनी सारु. भंडारा येथे मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉक्टरी मेमो वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोस्टेला सरतर्फे फिर्यादी पो. शि. फुलबांधे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०९/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर टाकण्याकरीता.